## फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २९९/२०१७ नि.क्र. २३ वरील आदेश

सदर अर्ज हा अर्जदार यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये दाखल केलेला असून सदर अर्ज निकाली होईपर्यंत अंतरिम पोटगी मिळणेकामी दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदार व सामनेवाला नं.१ यांचा विवाह दि. २८/१२/२०१४ रोजी सोलापूर येथे मुस्लिम कायद्यानुसार झालेला आहे. सदर विवाहातून अर्जदार यांना दि.२६/०१/२०१७ रोजी अर्जदार नं.२ ही मुलगी झालेली आहे. लग्नानंतर अर्जदार नं.१ व सामनेवाला नं.१ हे १५ दिवस व्यवस्थित नांदले. त्यावेळी अर्जदार , सामनेवाला सोबत त्यांचे आई–वडिल, त्याची बहिण डॉ.शाहिन व तिचा नवरा डॉ.नौशाद यांच्याबरोबर एकत्रात राहत होती. सामनेवाला हे व्यवसायाने इंटेरिअर डिझायनर असलेने तो पुणे, मुंबई, सोलापूर येथे फक्त आई–वडिलांनाच सांगून वारंवार जात होता. त्यामुळे अर्जदाराला घरात कोणीच विचारत नव्हते. अर्जदाराने सामनेवालाची चौकशी केली असता सामनेवालाचे बहिण व तिचा नवरा अर्जदारास ' तुला नव–याच्या चौकशा करणेचे कारण नाही, तो १५ दिवस पुणे येथे राहिल अथवा महिनाभर राहिल तुला नव–याशिवाय इथे राहायचे असेल तर राहा नाहीतर घरातून चालती हो' असे बोलत असे. त्यावर अर्जदाराने सामनेवालाची आई–वडिलांचेकडे तक्रार केली असता ते 'तुला जेवण करुन वाढणेसाठी इथे आणली आहे, राहायचे असेल तर राहा अन्यथा माहेरी निघून जा, तुझ्यासारख्या ५० पोरी बायको म्हणून मिळतील' असे म्हणाले. तसेच अर्जदाराला अधिक बोलल्यास सामनेवाला, त्याचे आई–वडिला, बहिण, भावजी हे हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण ,शिवीगाळ करुन शारीरिक व मानसिक त्रास देत होते. तसेच सामनेवाला अर्जदाराला वारंवार छोट्या छोट्या गोष्टीवरुन अर्जदाराला माफी मागणेस सांगत होते.

**०३.** अर्जदार ही सासरी नांदत असताना अर्जदार ही सासरी नांदत असताना अर्जदाराला दिवस गेलेनंतर सातव्या महिन्यात तिच्या डोहाळे जेवण करण्यासाठी अर्जदाराचे आई–वडिल सोलापूर इथे गेले असता सामनेवालांनी सर्व साहित्य ठेवून घेवून डोहाळे

जेवण न करताच अर्जदाराचे आई–वडिलांना पाठवून दिले. त्यानंतर दि. २९/०१/२०१७ रोजी अर्जदार हिची सोलापूर येथेच प्रसुती झाली व तिला मुलगी झाली. अर्जदाराला मुलगी झाल्यामुळे सामनेवाला व त्याच्या घरातील सर्व लोक अर्जदारावर अधिक चिडले. दि.१५/०३/२०१७ रोजी अर्जदार व तिचे बाळाची तब्येत बिघडल्यानंतर सामनेवालांनी कोणताही औषधोपचार न केल्याने अर्जदाराने आई–वडिलांकडे जावून औषधोपचार घेते असे सांगितले. त्यामुळे सामनेवालाने अर्जदाराचे आई–वडिलांना बोलवून घेवून अर्जदार व तिच्या बाळास अंगावरील सर्व दागिने काढून घेवून नेसत्या वस्त्रनिशी घरातून हाकलून दिले. सामनेवालाने अर्जदार नं.२ च्या शिक्षणाचा, तसेच अर्जदाराच्या उदरनिर्वाहाचा व भविष्याचा कोणताही विचार केला नाही. सामनेवाला इंटेरिअर डिझायनर असून त्याला दरमहा रक्कम रुपये ५,००,०००/– मिळतात. तसेच सामनेवालाचे सोलापूर येथे एस.बी.इंटेरिअर्स ॲण्ड फर्निचर्स व एस.बी.नदाफ या नावाने फर्निचर तसेच इतर वस्तू विक्रीचा व्यवसाय आहे. तसेच एम.आय.डी.सी येथे दोन कारखाने आहेत. त्यापासून त्याला दरमहा १०,००,०००/– उत्पन्न मिळते. सामनेवालाचे सोलापूर येथे दोन मोठी घरे असून त्यापैकी एक घर भाड्याने दिले आहे. त्याचे दरमहा रुपये ५०,०००/– उत्पन्न मिळते.

**०४.** अर्जदार नं.१ व २ यांना स्वतःचे दैनंदिन गरजा व औषधोपचारासाठी मासिक रुपये ५०००/– ,कपडेलत्ता व खाणेपिणेसाठी दरमहा प्रत्येकी रुपये ५,०००/– आवश्यक आहे. सबब, अंतरिम पोटगी मिळणेबाबत अर्जदाराने विनंती केलेली आहे.

**०५.** सामनेवालाने त्यांचे म्हणणे नि.क्र.२१ वर दाखल करून अर्जदाराने नमुद केलेली सर्व कथने नाकारलेली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदाराने सामनेवालास त्रास देणेकरीता खोटा अर्ज दाखल केलेला आहे. लग्नानंतर ८ ते १० महिनेच अर्जदार सामनेवालाकडे व्यवस्थित नांदली. अर्जदार व सामनेवाला यांच्यात कसलाही वाद नव्हता. परंतु, अर्जदाराचे माहेरचे लोक अर्जदाराला सतत फोन करुन कराड येथे राहणेसाठी व नोकरी करणेसाठी दबाव टाकत होते. सामनेवालाने सदर गोष्टीसाठी नकार दिल्याने अर्जदार कोणतेही कारण काढून माहेरी जाण्याचा हट्ट करत, तसेच घरातील कामे न करणे, उध्दट बोलणे अशी कृत्ये करु लागली. सदर घटनेबाबत सामनेवालाने अर्जदाराच्या आई–

वडीलांना सांगितले असता त्यांनी सामनेवालास ' तुम्ही कराडला येवून राहा अन्यथा अर्जदाराला सोलापूरला नांदणेस येणार नाही’ असे सांगितले.

०६. सामनेवालाने अर्जदाराबरोबर नांदणेकरीता दि.१६/०२/२०१६ रोजी अर्जदारास रजिस्टर नोटीस पाठविली. परंतु अर्जदार नांदणेस गेली नाही. दि.२६/०२/२०१६ रोजी सदर नोटीसला खोटी उत्तरे दिली. दि. ०७/०३/२०१६ रोजी सामनेवालाने पुन्हा अर्जदारास नांदणेकरीता नोटीस पाठविले. परंतु अर्जदार नांदणेस गेली नाही. त्यानंतर दि.२२/०३/२०१६ रोजी अर्जदाराने सामनेवालासोबत नांदणेकरीता हमीपत्र दिले व दि.२६/०२/२०१६ रोजी दिलेल्या नोटीस उत्तरातील सर्व कथने अर्जदाराने नाकारली. त्यानंतर सामनेवाला त्याच्या बहिणीच्या घरी कोल्हापूर येथे आई–वडीलांसोबत कार्यक्रमाकरीता गेलेले असताना अर्जदाराने दि.२०/०३/२०१७ रोजी संध्याकाळी सोलापूर येथे तिच्या आई–वडीलांना बोलावून घेतले व दि.२१/०३/२०१७ रोजी सकाळी सामनेवाला घरी येण्यापूर्वीच अर्जदार तिच्या वस्तू घेवून वडिलांकडे लॉजमध्ये नेवून ठेवल्या. सामनेवाला व त्याचे आई–वडिल घरी आल्यानंतर सामनेवालाची परवानगी न घेता अर्जदार व तिचे आई–वडिल निघून गेले. त्यानंतर सामनेवालाला घरातील सोने चांदीचे दागिने व मौल्यवान वस्तू आढळून न आल्याने पोलीस आयुक्त यांचेकडे दि.०१/०८/२०१७ रोजी फिर्याद दाखल केले.

०७. लग्नानंतर दुस–या दिवशी अर्जदाराच्या आईने सामनेवालास एकट्यात बोलवून घेवून ' माझी मुलगी तुझ्या बरोबर लग्न करण्यास तयार नव्हती, आम्ही आई–वडिलांनी तुझ्याशी लग्न करण्यास भाग पाडले आहे, तिची मर्जी सांभाळ व तिच्या सांगण्याप्रमाणे वागणूक कर, माझ्या मुलीस स्वयंपाक येत नाही, ती सुशिक्षित असून मॉडर्न आहे, अन्यथा तुमच्याकडे राहणार नाही’ असे सांगितले. अर्जदार काही दिवस व्यवस्थित नांदल्यानंतर सामनेवालाला 'तू माझ्या योग्य नाही, तू मला शोभत नाही, खूप सुंदर मुलांचे स्थळ आले होते, माझ्या आई–वडीलांनी काय बघून लग्न करुन दिले ते मला समजले नाही’ असे म्हणून सामनेवालाला संसार सुखापासून वंचित ठेवले. अर्जदार नेहमी मोबाईलवर बोलत असे त्यामुळे सामनेवालाचे चुलत भावाने अर्जदाराच्या वडिलांना फोन

करुन सांगितले असता, अर्जदाराचे वडिलांनी सामनेवालाला सांगितले की, 'फोनवरुन बोलणारा आमच्या गावातील किरण शिंदे आहे, त्याला ताकीद दिलेली आहे व तुम्ही फोन काढून घ्या'. अर्जदार माहेरच्या लोकांच्या सांगण्यावरुन सामनेवालास 'कराड किंवा पुणे येथे फ्लॅट घे, अन्यथा मी येथे राहणार नाही' असे बोलत. सामनेवालाने अर्जदाराची समजूत काढली परंतु अर्जदाराच्या वागण्यात बदल झाला नाही.

**०८.** अर्जदाराने मूळ पोटगी अर्जाचे कामी सरतपास दिलेला असून सदर पोटगी अर्ज अर्जदाराचे उलटतपासावर नेमलेला आहे. त्यामुळे सदरचा अंतरिम पोटगी अर्ज चालू शकत नाही असे सामनेवालाचे म्हणणे आहे. तसेच, अर्जदाराने सामनेवालाविरुध्द याच कारणाकरीता कौटुंबिक हिंसाचार कायद्याअंतर्गत ४०१/२०१७ चा पोटगी मागणी अर्ज दाखल केलेला असून त्याचा अंतिम निर्णय झालेला नाही. त्यामुळे एकाच कारणाकरीता दोन ठिकाणी अर्जदाराला मागणी करता येणार नाही. तसेच अर्जदार स्वतःच दि.२१/०३/२०१७ रोजी आई–वडिलांसोबत स्वेच्छेने सामनेवालाची परवानगी न घेता निघून गेली आहे. सबब, अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी सामनेवालाने विनंती केलेली आहे.

**०९.** दोन्ही बाजूंचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार व सामनेवाला यांचे मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले.

**१०.** खालील मुद्दे निश्चित करून त्यांचे निष्कर्ष कारणांसह दिले आहे.

| **अ. नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार नं.१ व अर्जदार नं.२ हे सामनेवाला कडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**मुद्दा क्र. १ व २ करीता**

**११.** सामनेवाला यांनी कोठेही अर्जदार व मुलगी यांचेशी असलेले नातेसंबंध

नाकारलेले नाही. अर्जदाराचे असे कथन आहे की, सामनेवालाने लग्नाच्या १५ दिवसातच अर्जदार हिचा मानसिक व शारीरिक छळ सुरु केला. त्यानंतर सामनेवालाने अर्जदार हिस कोणतेही कारण नसताना राहत्या घरातून हाकलून दिले. याउलट, सामनेवालाचे असे कथन आहे की, अर्जदार माहेरच्या लोकांच्या सांगण्यावरुन सामनेवालास कराड किंवा पुणे येथे प्लॅट घे, अन्यथा मी येथे राहणार नाही असे म्हणत. सामनेवालाने अर्जदाराची समजूत काढली परंतु अर्जदाराच्या वागण्यात बदल झाला नाही. अर्जदार स्वतःहून सामनेवालाचा त्याग करुन आई–वडिलांसोबत निघून गेलेली आहे. यावरुन असे दिसून येते की, दोन्ही बाजूंनी एकमेकांविरुध्द आरोप प्रत्यारोप केलेले आहेत आणि सदर आरोप दोन्ही बाजूंनी दिलेल्या पुराव्यावरुन सिध्द होणार आहेत. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ चे अर्जाचा विचार करत असताना सर्वप्रथम पाहणे गरजेचे आहे की, सामनेवालाने तो अर्जदाराचे व मुलीचे सर्वप्रकारे पालन पोषण करणेस समर्थ असून देखील त्याने त्यांचे पालनपोषण करणेस नकार दिला आहे का हे पाहणे आवश्यक असून अर्जदार व मुलगी अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे.

१२. अर्जदाराने असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, सध्या ती कोणतेही उत्पन्न निर्माण करु शकत नाही. सामनेवालाने अर्जदाराचे हे कथन नाकारलेले नाही. याउलट, सामनेवालाने अभिलेखावर दाखल केलेल्या मालमत्ता व दायित्वाचे कागदपत्रावरुन सामनेवालाचे भाड्याच्या जागेत फर्निचरचे दुकाने असून सामनेवालाची आई नसीमा नदाफ हिचे नावे ४२/२/५ अ सोलापूर येथे घर मिळकत असल्याचे दिसून येते. तसेच, अभिलेखावर दाखल केलेले मालमत्ता व दायित्वाच्या प्रमाणपत्रावरुन असे दिसून येते की, अर्जदार उच्च शिक्षित आहे तसेच, सदर प्रमाणपत्राव्दारे सामनेवालाने त्यास दरमहा रक्कम रुपये १५,०००/– इतके उत्पन्न मिळत असल्याचे नमूद केलेले आहे. यावरुन, सामनेवाला याचे उत्पन्न समाधानकारक असल्याचे दिसून येते. अर्जदार जरी, उच्चशिक्षित असली तरी सध्या तिच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसून मुलगी मरियम हिची पूर्ण जबाबदारी तिच्यावर आहे. सामनेवाला अर्जदाराचा पती व मुलगी नरियम हिचे वडिल या नात्याने त्यांची जबाबदारी नाकारु शकत नाही. तरी या सर्व बाबींचा विचार करता, विविध वस्तुंचा व सोयी–सुविधांचा दर लक्षात घेता सामनेवाला यांनी अर्जदार व मुलगी नरियम

यांना एकत्रित दरमहा रु. ५,०००/– पोटगी म्हणून देण्यात यावे असा आदेश करणे योग्य ठरते. करीता, मुद्दा क्र.२ चे उत्तर सद्य स्थितीत अर्जदार व मुलगा नरियम यांना एकत्रित दरमहा रु. ५,०००/– याप्रमाणे पोटगी मिळणेस पात्र आहे. सामनेवाला यांनी अर्जदारास अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम पोटगी देणे योग्य होईल असे वाटते. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला यांनी अर्जदार व मुलगी नरियम यांना एकत्रित दरमहा रुपये ५,०००/– इतकी अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि.२७/०६/२०१९ पासून अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावी.

USHA DEVIDAS JADHAV
Digitally signed by USHA DEVIDAS JADHAV
Date: 2022.08.20 15:31:12 +0530

दिनांक – १६/०८/२०२२
ठिकाण– कराड.

(यु.डी. जाधव)
५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कराड.